# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.230/२०२२**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक संकुले यांना प्राप्त आदेशानूसार कळविण्यात येते की, मार्च २०२० पासुन कोविड २०१९ महामारीमुळे शैक्षणिक नियोजनावर विपरित परिणाम झालेला आहे. त्यामुळे अध्ययन व अध्यापन प्रक्रिया परीणामकारकपणे झालेली नाही. त्याचा एकंदरीत परिणाम हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर झालेला आहे. सदर बाब विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सदर अनुषंगाने उपाययोजना सूचविण्यासाठी मा. अधिष्ठाता मंडळाने मा. प्र—कुलगुरू, प्रा. डॉ. संजीव सोनवणे यांची एक सदस्यीय समिती गठित केली होती. त्यानुसार डॉ. सोनवणे समितीने सदर पार्श्वभूमीवर कोविड—१९ ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रम अहवाल सादर केलेला आहे. सोबत अहवालाची प्रत जोडलेली आहे. सदर अहवालात नमुद केलेले विविध उपक्रम व त्यासंबंधीच्या अनुषंगीक सूचनांचे अवलोकन करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरून काढण्याबाबतचे उपक्रम सर्व महाविद्यालय व विद्यापीठातील विभागात/संकुलात राबविण्यात यावेत.

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. शै.प्रवेश/8926
दिनांक : २५/०८/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :—**

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

} सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

E:\PGSECTION\CIRCULAR 2022.DOCX

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## कोविड १९ – ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रम

मार्च २०२० नंतर कोविड १९ महामारी कालामध्ये सर्वच शैक्षणिक बाबींवर विपरित परिणाम झाला आहे. त्यात सर्वार्थाने विचारात घेण्याची बाब म्हणजे अध्ययन-अध्यापनप्रक्रियेमध्ये आलेला अडथळा होय. कोविड १९ कालावधीमधील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये पदवी व पदव्युत्तर पदवीस्तरातील विद्यार्थ्यांचा दर्जा खालावल्याबद्दलची अनेक सर्वेक्षणे व निरीक्षणे नोंदविण्यात आली, तसेच या शैक्षणिक वर्षांत कोविड १९ महामारीत प्रत्यक्ष पूर्ण अध्ययन-अध्यापनप्रक्रियेऐवजी ऑनलाइन पद्धतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात आला. उच्च शिक्षणस्तरावर पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर खालावला व अपेक्षित अध्ययननिष्पत्ती साध्य झाली नाही.

परंतु शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून मात्र कोविड १९ महामारी पूर्वपरिस्थितीत सर्व जनजीवन सुरळीत झाले असल्यामुळे सर्व शैक्षणिक उपक्रम विद्यापीठ विभाग व महाविद्यालयांमध्ये पूर्ववत चालू झाले आहेत. तरीसुद्धा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील विद्यार्थ्यांची अध्ययनहानी भरून काढणे आणि पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा दर्जा उंचावणे अत्यंत गरचेचे परंतु आव्हानात्मक आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक विद्यार्थ्यासाठी कोविड १९ महामारी अध्ययन-अध्यापन हानी भरून उपचारात्मक उपक्रम विद्यापीठ, विभाग व महाविद्यालयांमध्ये खालील प्रमाणे राबविण्यात यावेत.

**योजना/उपक्रम :** कोविड १९ – ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रम योजना.

**हेतू :** कोविड १९ महामारीमुळे पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे .

**उद्दिष्टे :** १) पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची सत्र व विषयनिहाय अध्ययन हानी निश्चित करणे.

२) नैदानात्मक चाचणी आयोजित करून सदर अध्ययन हानी मोजणे आणि नैदानात्मक चाचणीच्या निष्कर्षांचे विषयनिहाय विश्लेषण करणे.

३) सदर विश्लेषणावरुन उपचारात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रम तयार करणे व राबविणे.

४) उपचारात्मक अध्ययन-अध्यापनपश्चात चाचणी आयोजित करून अध्ययननिष्पत्ती दर्जा उंचावण्याची खात्री करणे.

५) उपरोक्त उद्दिष्ट क्रमांक ४ प्रमाणे काही विद्यार्थ्यांचा दर्जा सुधार नोंदविण्यात आला नसल्यास अशा विशेष विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्ययन-अध्यापन चक्र राबविणे.

कोविड १९ – ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रमाची कार्यप्रणाली

सदर योजना राबविण्याचे टप्पे खलील प्रमाणे आहेत.

१) सदर कोविड १९ – ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीच्या पदवीसाठी सत्र १, ३ व ५ व पदव्युत्तरच्या सत्र १, ३ साठी तसेच पदवीसाठी सत्र २, ४, ६ आणि पदव्युत्तरसाठी सत्र २, ४ अशा रीतीने प्रत्येक सत्रांच्या सुरवातीला प्रत्येक विषयासाठी राबविण्यात यावी.

२) सदर योजना राबविण्याची जबाबदारी प्रत्येक विषय शिक्षकाची आहे.

३) प्राचार्य व विभाग प्रमुख यांनी संपूर्ण योजना आराखडा तयार करून कोविड १९ – ज्ञान सुधार उपचारात्मक उपक्रम राबविण्यासाठी समिती घटित करावी.

**४) योजनेचा आराखडा तयार करताना**

अ. सदर योजना सर्व विषयांसाठी राबविण्यात यावी.

आ. नैदानिक चाचणी विषयज्ञान, संकल्पना स्पष्टता, आकलन, उपयोजन, पृथःकरण / संश्लेषण आणि टीकात्मक मूल्यमापन या स्तरांवर स्तर आधारित पूर्वज्ञान तपासणारी तयार करण्यात यावी, जेणेकरून पूर्वज्ञानावर आधारित नवीन सत्रातील विषयज्ञान आकलित होईल.

इ. नैदानिक चाचणी अध्यापकांनी आपल्या स्तरावर आपल्या विषयांसाठी आवश्यक असणाऱ्या पूर्वज्ञानावर आधारित ठरवावी.

ई. नैदानिक चाचणी निकालाचे विश्लेषण करून बोधात्मक हानी (न समजलेले विषयज्ञान) निश्चित करावी.

उ. दर्जा कमी अथवा आकलित न झालेल्या विषयज्ञानाचे विषयाच्या गरजेप्रमाणे वर्ग अध्यापनाचे, तासिकांचे नियोजन, तासिकांची संख्या, अध्ययन पद्धती इ. बाबींचा विचार करून समृद्ध उपचारात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रमाची योजना तयार करावी.

ऊ. सदर उपचारात्मक अध्ययन-अध्यापन उपक्रम राबविण्याचे वेळापत्रक तयार करून महाविद्यालय / विभाग समितीस सादर करावे.

ऋ. प्रत्येक विषयासाठी वेळापत्रकामध्ये प्रथम वर्ग अध्यापनाच्या किमान १० तासिका आवश्यक आहेत.

ऌ. वेळापत्रकाची अंमलबजावणी महाविद्यालय व विभाग यांच्या स्तरावर सत्र आरंभाच्या प्रथम कालावधीत करावी.

ऍ. आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना पूर्वज्ञान समृद्ध होण्यासाठी संदर्भ ग्रंथ, साहित्य, वेब साहित्यादि आशय यांची यादी उपलब्ध करून द्यावी.

ऐ. उपचारात्मक अध्यापन प्रक्रियेच्या शेवटी पुन्हा पश्चात नैदानिक कसोटी जी पूर्ण चाचणी आहे ती घेऊन अध्यापन स्तर दर्जा उंचावण्याची खात्री करावी.

ए. योजना राबविल्यानंतर विषयाप्रमाणे संपूर्ण योजनेचा शैक्षणिक दर्जा उंचावल्याचा आणि योजना राबविल्याचा एकत्रित अहवाल तयार करणे गरजेचे आहे.

ऐ. उपरोक्त टप्प्याव्यतिरिक्त दर्जा उंचविण्यासाठी महाविद्यालय / विभाग स्तरावर नवे उपक्रम अथवा प्रयोग करण्यास अध्यापकांना प्रोत्साहन देण्यात यावे.

सदर योजना विद्यार्थ्यांचा ज्ञान स्तर उंचावण्यासाठी अवलोकन न झालेल्या विषयज्ञानातील घटक समजण्यासाठी नवीन विषय समजून घेण्यास गरजेचे असल्याने योजना राबविताना, कर्तव्याचा भाग म्हणून राबवून शैक्षणिक दर्जा उंचविण्याची उत्तम संधी आहे. अध्यापक आपल्या स्तरावर या योजनेचा परिणाम वाढविण्यासाठी उपक्रमांची भर घालण्यास स्वतंत्र असतील मात्र या उपक्रमाचा हेतू सफल होणे आवश्यक आहे.

**प्रा. संजीव सोनवणे**
प्र-कुलगुरू
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Rahul/desktop/letters/PVC